# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

**४५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४/०८/२०२०**

**जिल्हा : धुळे**

| मागील आठवड्यातील हवामान (२८/०७/२०२० ते ०३/०८/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०५/०८/२०२० ते ०९/०८/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ | दिनांक | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ३९ | २८ | २३ | ३ | १२ |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३३ | ३० | ३१ | ३१ |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २४ | २५ | २४ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ५ | ६ | ८ | ६ | ७ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ८५ | ८४ | ८३ | ८३ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५२ | ५७ | ६८ | ५९ | ५९ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | १६ | १५ | १४ | २० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहील.<br>पुढील तीन दिवस काही ठिकाणी जोराच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे . |
| सामान्य सल्ला | | **पिकांमध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी आणि साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.**<br>**जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.**<br>**विजेचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.**<br>**पावसाने उघडीप दिल्या नंतर जमीतीत ओलाव्याचा अंदाज घेवूनच पिकामध्ये कामास सुरुवात करावीत. (आंतरमशागतीची, तणषनयंत्रणाची, खते देणे, फवारणी इ.)**<br>शेतीचे का मे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>पावसाळ्यात फवारणी करतांना स्टीकरचा वापर करावा.<br>पिकावर कीटकनाशकाची , बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| संदेश | | |
| कापूस | उगवण ते पातेलागणे | कपाशी पिकामध्ये पाणी साचल्यास मुळकूज व मर रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.<br>आळवणी:<br>मर रोगाची लक्षणे दिसू लागताच १.५ किलो युरिया + १.५ किलो पालाश १०० लिटर पाण्यात मिसळून १५० ते २०० मिली द्यावे.<br>त्यानंतर ८-१० दिवसांनी २ किलो डिएपी १०० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण १५० ते २०० मिली झाडाच्या बुंध्याजवळ ओतावे व लगेच पाणी द्यावे.<br>फुलकिडे या रस शोषणार्याव किडींच्या नियंत्रणासाठी १२ मिली फिप्रोनील ५% प्रवाही किंवा २ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्लू.जी. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| भुईमुग | रोप अवस्था | भुईमुग पिकात ज्यादा पावसाने पाणी साठून राहील्यास भुईमुग पिवळा पडतो त्याकरिता साठलेले पाणी काढून निचरा करावा.<br>भुईमुग पिकावरील रस शोषणार्याप किडीसाठी मिथिल डिमेटॉन २५ ई.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जून मध्ये पेरणी केलेल्या भुईमुग पिकात वापसा आल्यास हात कोळप्याने खुरपणी करावी.<br>हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी कार्बोफ्युरॉन ३% दाणेदार ३३ कि.ग्रॅ./ हेक्टर वापरावे व शेताला हलके पाणी द्यावे. |
| सोयाबीन | फांद्या लागणे | स्पोडोप्टेरा अळीच्या नियंत्रणासाठी मुख्य पिकाच्या कडेने एरंडीची एक ओळ सापळा पिक म्हणून पेरावी .<br>सोयाबीन पिकात पाने खाणार्यार अळीचे नियमित सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यासाठी स्पोडोलूरचे हेक्टरी ८ ते १० कामगंध सापळे शेतात उभारावे |
| बाजरी | | खोड किड किंवा खोड माशीच्या नियंत्रणासाठी १४ मिली मेलॅथिऑन ५०% प्रवाही प्रति १० लीटर |

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | पाण्यात मिसळून फवारावे. |
| मुग, उडीद | वाढ | उडीद आणि मुग पिकात पिवळा विषाणूमुळे रोगग्रस्त व पाने आकसलेली झाडे उपटून शेताबाहेर खड्डा करून गाडून घ्यावीत.<br>उडीद आणि मुग पिकात भुरी पिकात भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी सल्फर ८०% डब्लु.पी. ३० ग्रॅम/ १० लिटर पाणी या बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>मुग आणि उडीद पिकात खोड माशीचा प्रादुर्भाव आढळल्यास फोरेट दाणेदार १० किलो या प्रमाणात मातीत मिसळावे.<br>मूग आणि उडीद पिकांमध्ये काही भागात नाकतोड्यांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या पिकावरील ही प्रमुख कीड जरी नसली तरी पानांवर छिद्र पडलेली दिसत असल्यास संभाव्य आर्थिक नुकसान टाळण्यासाठी अझाडीरेक्टीन १५०० पी.पी.एम. ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>मूग आणि उडीद पिकात पिवळा मोझेक विषाणूमुळे ग्रस्त झालेले झाडे उपटून शेताबाहेर खड्डा करून गाडून घ्यावीत. |
| तूर | रोप अवस्था | तूर पिकात पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे त्यासाठी अझाडीरेक्टीन १५०० पी.पी.एम. ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>तूर  पिकात खोड माशीचा प्रादुर्भाव आढळल्यास फोरेट दाणेदार १० किलो या प्रमाणात मातीत मिसळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>पावसाळ्यात जनावरांना ओला चारा अति प्रमाणात दिल्यामुळे जनावरांचे पोट फुगते त्यामुळे ओला चारा प्रमाणात द्यावा.<br>पावसाळ्यात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हौदातून संपूर्ण खुर बुडतील अशा सोडाव्यात. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : ०४/०८/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**